# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 09 वाजून 20 मिनिटं

**दिनांकः03.08.2024** **वारःशनिवार**

---

1. केंद्रीय मंत्रिमंडळाची आठ राष्ट्रीय रस्ते प्रकल्पांना मंजुरी, पुण्याजवळच्या नाशिक फाटा-खेड उन्नत मार्गिकेचाही समावेश
2. राष्ट्रीय शिक्षण धोरणात शिक्षण संस्थांची गुणवत्ता आणि मूल्यांकन पद्धतीत सुधारणा करण्यासाठी राज्यपालांनी योगदान द्यावं-राष्ट्रपतींचं आवाहन
3. जलद विकासासाठी भारतानं डिजिटलायझेशनद्वारे लाखो लोकांना गरिबीतून बाहेर काढल्याचं उदाहरण जगानं अभ्यासावं-संयुक्त राष्ट्र महासभेचे अध्यक्ष डेनिस फ्रान्सिस यांचं प्रतिपादन
4. इस्राएल मधील तणावपूर्ण परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर भारतीय नागरिकांसाठी सतर्कता सूचना जारी,आवश्यकता नसल्यास प्रवास टाळावा-भारतीय दुतावासाची सूचना
5. 2024-25 वर्षासाठी, 31 जुलै पर्यन्त विक्रमी 7 कोटी 28 लाख प्राप्तीकर विवरणपत्र दाखल आणि
6. पॅरिस ऑलिंपिक स्पर्धेत भारतीय महिला खेळाडू आज सर्वोत्तम खेळाचं प्रदर्शन करणार

**रस्ते-मंजूर**

केंद्रीय मंत्रिमंडळानं 50 हजार 655 कोटी रुपये खर्चाच्या नऊशे 36 किलोमीटर लांबीच्या 8 महत्त्वाच्या राष्ट्रीय रस्ते प्रकल्पांना मंजुरी दिली आहे. महाराष्ट्रातल्या पुण्याजवळच्या नाशिक फाटा-खेड उन्नत मार्गिकेचाही यामध्ये समावेश आहे. या रस्त्यांमुळे देशात दळणवळणाची कार्यक्षमता सुधारण्यास मदत होईल, अशी माहिती केंद्रीय माहिती प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी काल नवी दिल्लीत प्रसारमाध्यमांना दिली. हे रस्ते प्रकल्प देशाच्या 2047 च्या विकसित भारताच्या धोरणांशी सुसंगत असल्याचं अश्विनी वैष्णव म्हणाले. या प्रकल्पांतर्गत, 4 हजार 613 कोटी रुपयांमध्ये बांधा वापरा हस्तांतरीत करा या तत्वावर 88 किलोमीटरचा सहा पदरी आग्रा-ग्वाल्हेर राष्ट्रीय द्रुतगती महामार्ग विकसित केला जाईल. त्यामध्ये 2031-किलोमीटर लांबीच्या चार पदरी खरगपूर-मोरेग्राम महामार्गाचाही समावेश असेल. यासाठी दहा हजार दोनशे सत्तेचाळीस कोटी रुपयांचा खर्च होणार आहे.

**पंतप्रधान-रस्ते**

दरम्यान, राष्ट्रीय द्रुतगती महामार्ग परियोजनेमुळे देशाच्या आर्थिक वाढीला चालना मिळेल तसंच रोजगाराच्या संधि उपलब्ध होतील असं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी समाज माध्यमांवरील संदेशात म्हंटलं आहे. यावरून अखंड भारत सरकारची वचनबद्धता स्पष्ट होते असं ते पुढे म्हणाले.

**राज्यपाल परिषद**

तीन नव्या गुन्हेगारी कायद्यांच्या अंमलबजावणीमुळे देशात न्यायदानाचं एक नवीन पर्व सुरू झालं आहे, असं प्रतिपादन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी केलं आहे. राष्ट्रपतींच्या हस्ते काल नवी दिल्लीत दोन दिवसांच्या राज्यपाल परिषदेचं उद्घाटन झालं, त्यावेळी त्या बोलत होत्या. समृद्ध लोकशाहीसाठी केंद्र सरकारच्या विविध यंत्रणांनी सर्व राज्यांसमवेत समन्वयानं काम करणं गरजेचं आहे. हा समन्वय राखण्यासाठी आपण राज्यांचे प्रमुख म्हणून कशाप्रकारे सहाय्य करू शकतो यावर राज्यपालांनी विचार करावा असा सल्ला त्यांनी दिला. राष्ट्रीय शिक्षण धोरणात शिक्षण संस्थांची गुणवत्ता आणि मूल्यांकन पद्धतीत सुधारणा करण्यावर भर देण्यात आला आहे. राज्यातल्या विद्यापीठांचे कुलपती म्हणून या सुधारणा घडवून आणण्यात आपलं योगदान द्या असं आवाहन राष्ट्रपतींनी केलं.

**<u>आरोग्य-तरतूद</u>**

लोकसभेत 2024-25 साठीच्या आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयाशी संबंधित अर्थसंकल्पीय तरतुदींच्या मागण्यांवर काल चर्चा झाली. चर्चेच्या सुरुवातीला काँग्रेसचे तारिक अन्वर यांनी सर्वसामान्यांना वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून देण्यावर भर दिला. ग्रामीण भागातील मूलभूत आरोग्य सुविधा सुधारण्यासाठी यंदाच्या अर्थसंकल्पात पुरेशी तरतूद करण्यात आली नसल्याचा आरोपही त्यांनी केला. औषधांच्या अति किमतींकडं लक्ष वेधत लोकांना औषधं परवडत नसल्याचा आरोपही तारिक अन्वर यांनी केला. तसंच द्रमुकच्या डॉ. राणी श्रीकुमार यांनी सरकारला आरोग्य आणि कुटुंब कल्याणासाठी अर्थसंकल्पीय तरतूद ही सकल देशांतर्गत उत्पन्नाच्या अडीच टक्क्यांपेक्षा जास्त वाढवण्याची तसंच निधीचं वेळेवर वाटप करून तामिळनाडू राज्यालाही केंद्र सरकारनं सहकार्य करण्याची विनंती केली. तर संयुक्त जनता दलाच्या रामप्रित मंडल यांनी केंद्रीय अर्थसंकल्पात आरोग्य क्षेत्रासाठी 90 हजार 659 कोटी रुपयांची अर्थसंकल्पीय तरतूद केल्याचं स्वागत केलं. यापैकी तीन हजार कोटी रुपयांहून अधिकचा निधी संशोधन कार्यांसाठी राखून ठेवण्यात आल्याचं त्यांनी सांगितलं.

**<u>डेंग्यू</u>**

2024 मध्ये आत्तापर्यंत देशभरात डेंग्यूचे 32 हजारांहून अधिक रुग्ण आढळले आहेत. अशी माहिती केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी काल लोकसभेत एका लेखी उत्तरात दिली. 2023 च्या याच कालावधीत देशातील डेंग्यूची रुग्ण संख्या 18 हजार 391 होती असंही ते म्हणाले. केंद्र सरकार आणि संबंधित यंत्रणा देशातील डेंग्यूच्या उद्रेकाच्या प्रादुर्भावाचा नियमितपणे आढावा आणि निरीक्षण करत असल्याचंही जाधव यांनी सांगितलं.

**<u>अमरावती-कोरोना</u>**

महाराष्ट्रातल्या अमरावती मध्ये 6 जणांना कोरोनाची लागण झाल्याचं आढळून आलं आहे. शहरात कोरोनाची लक्षणं असलेल्या 140 जणांचे नमुने तपासणीसाठी पाठवण्यात आले होते, त्यातील 6 जणांना लागण झाल्याचं स्पष्ट झालं आहे. लागण झालेल्या रुग्णांना जिल्हा सामान्य रुग्णालयात, विलगिरकरण कक्षात ठेवण्यात आलं असून त्यांच्यावर उपचार सुरू असल्याचं जिल्हा शल्यचिकित्सक डॉक्टर दिलीप सौंदळे यांनी सांगितलं आहे.

**<u>प्राप्तीकर विवरण</u>**

मूल्यांकन वर्ष 2024-25 वर्षासाठी, 31 जुलै पर्यन्त विक्रमी 7 कोटी 28 लाख प्राप्तीकर विवरण दाखल झाली आहेत. गेल्या वर्षीच्या मूल्यांकन वर्षीच्या तुलनेत या वर्षी 7 पूर्णांक 5 टक्क्यांची वाढ झाली असल्याचं अर्थमंत्रालयाने जारी केलेल्या पत्रकात म्हंटलं आहे. 5 कोटी 27 लाख प्राप्तीकर विवरण भरणाऱ्यांनी नवीन कर पद्धतीनुसार, तर, 2 कोटी 1 लाख लोकांनी नवीन कर रचनेनुसार विवरण दाखल केल्याचं या निवेदनात नमूद करण्यात आलं आहे. तसंच या वर्षी 58 लाख 57 हजार लोकांनी पहिल्यांदाच प्राप्तीकर विवरण भरलं आहे.

**<u>संयुक्तराष्ट्र-महासभा-अध्यक्ष</u>**

जलद विकासासाठी डिजिटलायझेशनच्या गरजेचा संदर्भ देत, जगानं याबाबतीत भारताचं उदाहरण अभ्यासावं असं सांगत भारतानं गेल्या पाच सहा वर्षात डिजिटलायझेशनद्वारे लाखो लोकांना गरिबीतून बाहेर काढलं आहे, असं प्रतिपादन संयुक्त राष्ट्र महासभेच्या 78 व्या सत्राचे अध्यक्ष डेनिस फ्रान्सिस यांनी केलं. ते काल रोममध्ये संयुक्त राष्ट्र संघाच्या अन्न आणि कृषी संघटनेच्या मुख्यालयात आयोजित 'सद्यकालीन आणि भविष्यात एकही व्यक्ती भुकेली राहू नये यासाठी करण्यात येणाऱ्या प्रगतशील उपाययोजना' या विषयावरील व्याख्यानात बोलत होते. भारतातला ग्रामीण भागातला शेतकरी वर्गाचा याआधी कधीही बँकिंग व्यवस्थेशी फारसा संबंध नव्हता ते आता त्यांच्या स्मार्टफोनच्या मदतीनं सहज आर्थिक व्यवहार करत आहेत, असंही फ्रान्सिस यांनी त्यांच्या व्याख्यानात  सांगितलं. भारतात इंटरनेटचा सर्वाधिक वापर होत असून जवळजवळ प्रत्येकाकडं मोबाइल आहे असंही त्यांनी त्यांच्या भाषणात सांगितलं.

**<u>इस्राइल-सुरक्षा सूचना</u>**

इस्राएल मधील भारतीय दुतावासाने भारतीय नागरिकांसाठी सतर्कता सूचना जारी केली आहे. इस्राइलमध्ये आवश्यकता नसल्यास प्रवास टाळावा असं या सुचनेत म्हटलं आहे. इस्राइलने हिजबूल गटाचा सर्वोच्च कमांडर फुआद शुक्र याला ठार केलं, त्यामुळे या प्रदेशात तणाव वाढला आहे. गोलान हाइट्समधे झालेल्या हल्ल्याचा आपण बदला घेतल्याचा दावा इस्राइलने केला आहे. इस्राइलमध्ये वास्तव्याला असलेल्या नागरिकांनी सतर्क राहावे तसंच स्थानिक अधिकाऱ्यांच्या सल्ल्यानुसार सुरक्षा नियमांचं पालन करावं असं आवाहन भारतीय दूतावसाने केलं आहे.

**<u>इस्राइल-एअर इंडिया</u>**

दरम्यान, इस्राइल तसंच पश्चिम आशिया क्षेत्रातील वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर, एअर इंडियाने सुरक्षेच्या कारणास्तव तेल अविवकडे जाणारी आणि तिथून येणारी आपली सर्व उड्डाणं 8 ऑगस्टपर्यन्त स्थगित केली आहेत. प्रवासी आणि कर्मचारी यांच्या सुरक्षेला प्राथमिकता देण्याच्या हेतूने हा निर्णय घेण्यात आला आहे. या कालावधीत प्रवास करणाऱ्या, पूर्वआरक्षित प्रवाशांना प्रवासाच्या तारखांमधे बदल अथवा रद्द करण्यासाठी आकरण्यात येणाऱ्या शुल्कात एका वेळेसाठी सूट देण्यात येणार आहे.

**<u>ऑलिंपिक्स</u>**

पॅरिस ऑलिंपिक स्पर्धेत काल, बॅटमिंटनमध्ये लक्ष्य सेन यानं पुरुष एकेरीच्या उपांत्य फेरीत प्रवेश केला. काल झालेल्या सामन्यात त्याने चीनी तैपेईच्या प्रतिस्पर्धी खेळाडूचा पराभव केला. ऑलिम्पिक स्पर्धेत बॅडमिंटनमध्ये पुरुष एकेरीच्या उपांत्य फेरीत प्रवेश करणारा लक्ष्य सेन हा पहिला भारतीय खेळाडू ठरला आहे.

या स्पर्धेत आज भारतीय चमूतील नारिशक्तीचा जागर होणार आहे. नेमबाजी, तिरंदाजी, मुष्टियुद्ध, नौकानयन आणि गोल्फ या खेळांत महिला खेळाडू त्यांच्या सर्वोत्तम खेळाचं प्रदर्शन करतील. या स्पर्धेत दोन वेळा पदक विजेती नेमबाज मनू भाकर, 25 मीटर पिस्टल स्पर्धेतील अंतिम फेरीत आणखी एक पदकावर निशाणा साधत पदकांची 'हॅट ट्रिक' नोंदवण्याचा प्रयत्न करेल.

तिरंदाजीत उप-उपांत्यपूर्व फेरीत दीपिका कुमारीचा सामना जर्मनीच्या मिशेल क्रोपेनशी, तर, भजन कौरचा सामना इंडोनेशियाच्या खेळाडूशी होणार आहे.

पुरुषांच्या मुष्टियुद्धात, निशांत देवचा सामना 71 किलो वजनी गटाच्या उपांत्यपूर्व फेरीत दाखल झाला असून, आज त्याचा सामना मेक्सिकोच्या खेळाडूशी होणार आहे. निशांतने हा सामना जिंकल्यास भारताच्या खात्यात आणखी एक पदक जमा होईल.

गोल्फ मध्ये शुभंकर शर्मा आणि गगनजीत भुल्लर तिसऱ्या फेरीत खेळतील तर, नौकानयन स्पर्धेतील डिंगी प्रकारात नेत्रा कुमानन आणि विष्णु सरवनन आपापल्या फेऱ्या खेळतील.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं.

# नमस्कार.